काम लवकर करावयाचे असेल तर मुहूर्त पाहण्यात वेळ घालवू नका.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | रविवार २३ मार्च २०२५ | अंक १०२ पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु



SUN Touriism INTERNATIONALL PVT. LTD. Since 2007

All TOURS घर से घर तक दिल से दिल तक 1st TIME in TRAVEL INDUSTRY

www.suntourismpune.in

सन टुरिझम

प्रस्तुत करते

देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !

आमच्या विशेष टूर पॅकेजेस

काश्मीर, वैष्णोदेवी, नैनीताल, शिमला, अयोध्या ग्रँड युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, दुबई, श्रीलंका व्हिएतनाम, सिंगापूर, थायलंड, बाली

आता आपल्या स्वप्नांच्या सहलींची नोंदणी करा...

-: अधिक माहितीसाठी संपर्क :-

99222 22272 / 7602727555


# सोशल मीडियावर पोस्ट करणाऱ्यांनाही सहआरोपी करणार

## देवेंद्र फडणवीस यांची मोठी माहिती



### पंतप्रधानांचा दौरा होणार का ?

येत्या ३० मार्च रोजी पंतप्रधान मोदींचा नागपूर दौरा होणार आहे. नागपूर शहरातील अशांततेच्या वातावरणात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा दौरा होणार का? असा सवाल उपस्थित होत आहे. यावरही मुख्यमंत्री फडणवीसांनी उत्तर दिलं. पंतप्रधानांच्या दौ--याला काही परिणाम होणार नाही. जी घटना झाली ती एका भागात झाली. ६० के ७० टक्के नागपुरात काही घडलं नाही. लोकांचं जनजीवन सुरक्षित आहे. त्यामुळे तो दौरा नीट होणार. ज्या भागात तणाव होता त्यात शांतता आहे. पंतप्रधानांचा दौरा ज्या पद्धतीने ठरला आहे. त्या पद्धतीनेच होईल. दौरा ठरल्याप्रमाणेच होईल,असे देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं.

### पोलिसांवर हल्ला करणा-यांवर..

आतापर्यंत १०४ लोकांना अटक केली आहे. त्यात ९२ लोक आहेत आणि १२ लहान मुलं आहेत. जोपर्यंत शेवटच्या दंगेखोराला पकडलं जात नाही तोपर्यंत अटक सत्र सुरू राहील. कोणत्याही प्रकारे कुणाला दंगा करून दुसऱ्यांचं नुकसान करण्याची परवानगी दिली जाणार नाही. त्यामुळेच दंगेखोरांची प्रॉपर्टी विकून नुकसान भरपाई वसूल करणार आहोत. जोपर्यंत दंगलखोरांना धडा शिकवत नाही, तोपर्यंत कारवाई सुरू राहील. ज्यांनी पोलिसांवर हल्ला केला आहे. त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाणार आहे. त्यांच्यावर कडक गुन्हे दाखल करून कठोर शिक्षा देणार आहे,असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केलं.




औरंगजेबाच्या कबरीच्या मुद्यावरून सुरू असलेल्या वादादरम्यान सोमवारी संध्याकाळी नागपूरमध्ये मोठा हिंसाचार झाला. रात्रीच्या सुमारास हिंसक संघर्ष झाला होता. यावेळी दगडफेक, वाहनांची तोडफोड, जाळपोळ असे प्रकार घडले होते. यामुळे तणावाचे वातावरण होत, बरीच खळबळही माजली. या हिसांचारानंतर नागपूरमध्ये अनेक भागांत संचारबंदी लावण्यात आली असून अजूनही काही भागात कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात आहे. दरम्यान हिंसाचाराच्या या घटनेनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज पहिल्यांदाच नागपूरमध्ये आले होते. त्यांनी पोलीस आयुक्त, एसपी आणि सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या या संपूर्ण घटनेचा आढावा घेतला. माध्यमांशी संवाद साधताना फडणवीस यांनी संपूर्ण घटनेसंदर्भात पुन्हा माहिती दिली.

# ‘तेजस’च्या अध्यक्षपदी ॲड.प्रकाश कवठेकरांची फेरनिवड



बीड: तेजस अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या अध्यक्षपदी तिसऱ्यांदा ॲड.प्रकाश कवठेकर यांची निवड झाली आहे. मागील आठ वर्षात तेजस अर्बनने आपली पत कायम राखली आहे. तेजस अर्बन को.ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायटीच्या मुख्य शाळेत पदाधिकारी यांच्या निवडीसाठी बैठक आयोजित केली होती. यावेळी उपाध्यक्षपदी दत्ता सर्जेराव घरत तर सचिवपदी रामदास सुंदर ठोसर यांची निवड केली. ॲड.प्रकाश कवठेकर यांनी मागील आठ वर्षापुर्वी तेजस अर्बन को.ऑपरेटिव्ह सोसायटीची स्थापना केली. बीड, डोंगरकिन्ही, वैद्यकिन्ही, उखंडा अशा चार ठिकाणी चार शाखा उघडण्यात आलेल्या आहेत. या ठिकाणी ठेवीदार मोठ्या विश्वासाने व्यवहार करत आहेत. ॲड.कवठेकर यांनी तेजस अर्बनच्या माध्यमातून ग्रामीण भागातील तरूण आणि बचतगटातील सदस्यांच्या हाताला काम देण्यासाठी आणि उद्योग व्यवसायाला चालना देण्यासाठी मोठ्या प्रमाणात कर्ज वाटप केले आहे. यामुळे तेजस अर्बन नावारूपाला आली आहे. ॲड.प्रकाश कवठेकर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजीत केलेल्या बैठकीला पीठासन अधिकारी म्हणून एस.एस. सांगुळे हे होते तर उपस्थित जेष्ठ संचालक शिवाजी लोखंडे, बाबुराव कदम, ज्ञानेश्वर आगे, कैलास किर्दात, रामेश्वर गाडे, दिनेश जाधव, लिंबाजी भोंडवे आदी उपस्थित होते.

# मग आम्ही काय मारामाऱ्या करायच्या का? त्या भेटीची चर्चा अन भुजबळ चांगलेच संतापले



राजकीय वर्तुळातून मोठी बातमी समोर येत आहे. गेल्या काही दिवसांपासून राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील हे अजित पवार यांच्या राष्ट्रवादीमध्ये प्रवेश करणार असल्याची चर्चा सुरू आहे. मात्र प्रत्येकवेळी जयंत पाटील यांनी ही शक्यता फेटाळून लावली आहे. दरम्यान आज उपमुख्यमंत्री अजित पवार आणि जयंत पाटील यांची भेट झाली. दोघांमध्ये तब्बल तीस मिनिटांपेक्षाही अधिक वेळ चर्चा झाली आहे. या भेटीनंतर पुन्हा एकदा चर्चेला उधाण आलं आहे. बंद दाराआड चर्चा अजित पवार यांना भेटण्यासाठी जेव्हा जयंत पाटील हे त्यांच्या कक्षात आले, तेव्हा तिथे गर्दी होती. जयंत पाटील कक्षात येताच तिथे उपस्थित असलेल्या सर्व व्यक्तिंना बाहेर काढण्यात आले. त्यानंतर जयंत पाटील आणि अजित पवार यांच्यामध्ये बंद दाराआड जवळपास तीस मिनिटांपेक्षाही अधिक वेळ चर्चा झाली. या भेटीमुळे चर्चेला उधाण आलं आहे, या भेटीवर आता छगन भुजबळ यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. नेमकं काय म्हणाले भुजबळ? आज अजित पवार आणि जयंत पाटील यांच्यामध्ये जवळपास तीस मिनिटांपेक्षा अधिक काळ चर्चा झाली. यावर आता भुजबळांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. आमची भेट रोजच होते, विधानसभेतही होते. मग आम्ही काही मारामाऱ्या करायच्या का? प्रत्येक जण विधानसभेत एकमेकांना भेटतो, हाल हवाल विचारतो. राजकारणात आम्ही विरोधी पक्षात आहोत, एकमेकांचे शत्रू नाही, असं भुजबळ यांनी म्हटलं आहे. दरम्यान औरंगजेबच्या कबरीवरून नागपुरात मोठा राडा झाला होता. जाळपोळ आणि दगडफेकीची देखील घटना घडली, या घटनेत पोलीस देखील जखमी झाले. यावर देखील यावेळी भुजबळ यांनी प्रतिक्रिया दिली आहे. पोलीस पोलिसांचं काम करत आहेत. जो चुकला असेल त्याच्यावर कायद्याप्रमाणे कारवाई होईल. सक्तीची कारवाई केली जाईल, मुख्यमंत्र्यांनी हे विधानसभेत देखील सांगितलं आहे. असं यावेळी भुजबळ यांनी म्हटलं आहे. तसेच कोरटकर वर्षावर असतील तर संजय राऊत यांनी तेथे जाऊन कोरटकरांना घेऊन यावे, असा टोलाही यावेळी भुजबळ यांनी लगावला आहे.

# क्रूर आणि सूडभावनेने वागणारा माणूस म्हणजे फक्त देवेंद्र फडणवीस माझ्या समाजाचा नुसता वापर केलाय

## मनोज जरांगे पाटील यांचा सरकार वर हल्लाबोल



। वृत्तसेवा जालना : छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराजांबद्दल आक्षेपार्ह विधान करून इतिहासकार इंद्रजीत सावंत यांना जीवे मारण्याची धमकी देण्याचा आरोप असलेला नागपूर येथील पत्रकार प्रशांत कोरटकर हा गेल्या २५ दिवसांपासून फरार आहे. यावरून मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार हल्लाबोल केलाय. प्रशांत कोरटकर सरकारचा सोयरा आहे. त्यामुळे तो सापडणार नाही. क्रूर आणि सूडभावनेने वागणारा माणूस म्हणजे फक्त देवेंद्र फडणवीस आहे. माझ्या समाजाचा नुसता वापर केला, असे त्यांनी म्हटले आहे मनोज जरांगे पाटील म्हणाले की, सरकारचा सोयरा आहे ना तो. त्याच्यामुळे तो सापडणार नाही. बाकीचे असते तर कशात तरी आतमध्ये टाकले असते. त्याच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून जेवढ्या मकोकासारख्या कलमा आहेत, तेवढ्या कलमा त्याच्यावर टाकल्या पाहिजेत. तुम्हाला जर खरंच छत्रपतींचे प्रेम आहे ना, हिंदूतले काही जण रोज छत्रपतींचा अवमान करत आहे. त्यांनी फक्त आमचा वापर भांडण्यासाठी केलाय आणि त्यांच्या राजकीय पोळ्या भाजून घेतल्या आहेत. क्रूर आणि सूडभावनेने वागणारा माणूस म्हणजे फक्त देवेंद्र फडणवीस आहे. माझ्या समाजाचा नुसता वापर केला. तुमचं हिंदुत्व आम्हाला परवडत नाही, आणि ते नकोही, आम्हाला छत्रपतींचा हिंदुत्व मान्य आहे. आता फक्त निषेध करून चालणार नाही, महापुरुषांवर बोलणाऱ्यांना धडा शिकवावाच लागेल, असा हल्लाबोल त्यांनी यावेळी केलाय.

### त्यांनी आमचा वापर फक्त भांडणासाठीच केला

मनोज जरांगे पुढे म्हणाले की, प्रशांत कोरटकर पोलिसांना सापडत नाही, हे पोलिसांचे अपयश नाही, देवेंद्र फडणवीस घडवून आणत आहेत. त्यांचे सोयरे आहे, अपमान करणारे सगळे त्यांचे सोयरे आहेत. त्यांनी एक टोळी तयार केली आहे. ती छत्रपती शिवाजी महाराजांचा आणि महापुरुषांचा अपमान करते. ते फक्त दाखवायला हिंदू दाखवतात. त्यांना बळ कोण देतं? त्यांना बोलायचं कोण सांगतं? यानंतर देवेंद्र फडणवीस दाटून मुटून बोलतील. देवेंद्र फडणवीस फक्त गोरगरिबाच्या लेकरांचं वाटोळं करू शकतात. त्यांनी काही जण फक्त जाणून-बुजून अवमान करण्यासाठी ठेवले आहेत. आता आम्हाला कळले की, मागील सत्तर वर्ष त्यांनी आमचा वापर फक्त भांडणासाठीच केला आहे. आम्ही जर हिंदू आहे तर आम्हाला मोठं कधी करणार आहे? हिंदू-हिंदू म्हणून आमचा घात किती दिवस करायचा आहे? धर्माचे रक्षण करणारी जात मराठा आहे, तुम्ही तिला संपवायला लागलात, अशी टीका त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर केली आहे.

बीड/महाराष्ट्र
मराठी साहित्य
दैनिक लोकआरंभ — लोकक्रांतीचा आरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
रविवार २३ मार्च २०२५
https://lokaarambh.com


## संपादकीय

### शिवरायांची कीर्ती आज सातासमुद्रापलिकडे

तिथीनुसार शिवजयंती नुकतीच पार पडली. त्याआधी १९ फेब्रुवारीला तारखेनुसार शिवजयंती साजरी करण्यात आली. तारखेनुसार आणि तिथीनुसार तितक्याच जल्लोषात जयंती साजरी केले जाणारे छत्रपती शिवाजी महाराज हे जगाच्या पाठीवरील एकमेव राजे आहेत. आपल्या अफाट बुद्धीचातुर्याने आणि अतुल पराक्रमाने पाच पातशाह्यांना शह देणाऱ्या. कडे- कपाऱ्यांतील मावळ्यांचे संघटन उभारून हिंदवी स्वराज्य स्थापन करणाऱ्या महापराक्रमी, महाबली शिवरायांचा वारसा महाराष्ट्राला लाभला हे महाराष्ट्राचे परमभाग्यच म्हणावे लागेल. शिवरायांची कीर्ती आज सातासमुद्रापलिकडे पोहोचली आहे. जगातील अनेक विद्यापीठांमधून आज शिवरायांच्या पराक्रमाचा आणि त्यांच्या आदर्श राज्यकारभाराचा इतिहास शिकवला जात आहे. महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या शिवरायांचा राज्यातील प्रत्येकालाच सार्थ अभिमान आहे. हा अभिमान शिवजयंती, शिवराज्याभिषेक दिन यांसारख्या शिवोत्सवांना अधिक उफाळून येतो. प्रतिदिन घरात शिवरायांची मूर्ती अथवा प्रतिमा पुजण्याचा आणि घराबाहेर पडताना तिला मुजरा करण्याचा नित्यक्रम आजही अनेक घरांतून पाळला जातो. आपण शिवरायांचे पाईक आहोत याची जाण ठेवण्यासाठी कपाळावर चंद्रकोर लावणारे अनेक तरुण मुंबईसारख्या धावपळीच्या शहरातही ठिकठिकाणी पाहायला मिळतात. चारचाकी, तीनचाकी गाडीवर मागच्या बाजूला तर दुचाकीच्या दर्शनी भागावर छत्रपती शिवाजी महाराजांचे चित्र असलेले स्टिकर आणि भगवे ध्वज लावलेल्या गाड्या राज्यातील रस्त्यांवर सर्वत्रच पाहायला मिळतात. पुणे, सातारा, कोल्हापूर परिसरात गेल्यावर तेथील नागरिकांनी आपल्या बंगल्यांची, घरांची नावे ही शिवाजी महाराजांच्या इतिहासाला अनुसरून किंवा गडदुर्गांच्या नावाने ठेवलेली पाहायला मिळतात. गळ्यात शिवरायांच्या चित्रांचे, शिवमुद्रांचे लॉकेट्स घालणारे, खिशाला महाराजांच्या चित्राचा बॅच लावणारे आणि महाराजांच्या चित्रांचे किचैन बाळगणारे राज्यात सर्वत्रच पाहायला मिळतात. हल्ली तर छत्रपती शिवाजी महाराजांसारखी दाढी आणि मिशी बाळगण्याची फॅशन तरुणवर्गात रूढ होत चालली आहे. शिवरायांप्रतीच्या श्रद्धेपोटी हे सर्व करणाऱ्या तरुणवर्गाच्या मनामध्ये शिवरायांप्रती प्रचंड आदर आणि आस्था असते यात दुमत नाही; मात्र मनातील आदर कृतीत आणण्यामध्ये आजचा तरुण कुठेतरी कमी पडत असतानाचे चित्र आज दिसत आहे. ट्रेन बसच्या प्रवासात, रहदारीच्या ठिकाणी छत्रपती शिवरायांसारखी दाढी मिशी कोरणारे आणि कपाळावर चंद्रकोर रेखाटणारे अनेक तरुण आपापसांत बोलताना शिव्यांचा आणि अपशब्दांचा वापर सर्रासपणे करताना आढळतात. गाड्यांवर लावण्यात आलेले महाराजांच्या प्रतिमेचे अथवा नावाचे स्टिकर म्हणजे खुद्द महाराजच आहेत या भावाने त्याची नियमितपणे स्वच्छता करणारे शिवभक्तही तुलनेने कमीच आहेत. स्वतः ला शिवभक्त म्हणवून घेणारे अनेक जण रस्त्यावर वाहतूक पोलिसांशी किंवा अन्य वाहनचालकाशी अरेरावी करताना किंवा वाद घालताना दिसून येतात. गाडीवर लावलेल्या स्टिकरच्या रूपाने आपल्यासोबत महाराजही आहेत आणि त्यांचे आपल्या प्रत्येक कृतीकडे बारीक लक्ष आहे हा भाव आपल्यात का निर्माण होत नाही ? जेव्हा आपण आपल्या गाडीवर महाराजांच्या प्रतिमेचे स्टिकर लावतो, गळ्यात शिवप्रतिमा परिधान करतो, कपाळावर चंद्रकोर लावतो आणि महाराजांसारखी दाढी मिशी ठेवतो तेव्हा या सर्वांसोबत आपली जबाबदारीही वाढते हे लक्षात घेतले पाहिजे. या सर्व गोष्टीविषयी आपल्यामध्ये तितकेसे गांभीर्य नसले, तरी समाज आपल्याकडे शिवभक्त म्हणून आदराने पाहतो हे ध्यानात ठेवायला हवे. त्यामुळे आपल्या प्रत्येक कृतीमधून शिवरायांच्या शिकवणुकीचा आदर्श दिसून यायला हवा. उपरोक्त गोष्टी परिधान करून आपण कार्यालयांत भ्रष्टाचार करत असू, गाडीवर महाराजांचे स्टिकर लावून वाहतुकीचे नियम पळत नसू, इतरांशी विनाकारण वाद घालत असू, घरी आई वडिलांचा आदर करत नसू, मुखातून अपशब्द उच्चारात असू तर समाज आपल्याकडे हीन दृष्टीने पाहिलच शिवाय प्रत्यक्ष छत्रपती शिवरायांचाही आपल्याकडून अवमान घडेल हे लक्षात घेण्याची आज नितांत आवश्यकता आहे. शिवरायांसारखे दिसणे, शिवप्रेमाचा देखावा करणे जेव्हढे सोपे आहे तेव्हढेच कठीण शिवरायांचा आदर्श कृतीत आणणे म्हणजेच शिवरायांना अपेक्षित अशी कृती करणे आहे. त्यामुळे आपल्यामुळे शिवरायांच्या प्रतिमेला धक्का लागणार नाही याची काळजी आपणच घ्यायला हवी. आपल्या प्रत्येकाच्या मनात आणि हृदयात छत्रपती शिवरायांविषयी नितांत आदर आणि श्रद्धा आहे त्यामुळे छत्रपतींचा आदर्श आपल्या नियमित आचरणातूनही वेळोवेळी दिसायला हवा

# डॉ.विमलताई मुंदडा-एक आठवण

केज विधानसभा मतदारसंघाला महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीपूर्वीपासूनचा एक वैभवशाली इतिहास लाभला आहे. महाराष्ट्राच्या निर्मितीपूर्वी मराठवाड्याचा हा भाग निजाम राजवटीत येत असल्याने, तो ङ्गमोमिनाबादफ या नावाने स्वतंत्र मतदारसंघ म्हणून ओळखला जात होता. १९५२ ते १९५७ या कालावधीत अंबाजोगाईचे द्वारकाप्रसाद चौधरी आणि बीडचे ॲड. रामलिंग स्वामी यांनी या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले. त्या काळात निजाम राज्याचे मुख्यमंत्री बी. रामकृष्ण राव आणि आरोग्यमंत्री फुलचंद गांधी यांनी आपली जबाबदारी पार पाडली. द्वारकाप्रसाद चौधरी यांच्या कार्यकाळात मोमिनाबाद येथे टी. बी. मेमोरियल हॉस्पिटल सुरू झाले, ज्याचे उद्घाटन फुलचंद गांधी यांच्या हस्ते झाले. १९५७ मध्ये निजाम राजवट संपुष्टात आली आणि महाराष्ट्र राज्याच्या पहिल्या विधानसभा निवडणुकीत अनुसूचित जाती प्रवर्गातून गोविंदराव गायकवाड यांना प्रतिनिधित्वाची संधी मिळाली. मतदारसंघाचा ऐतिहासिक प्रवास महाराष्ट्रात विधानसभेसाठी पहिल्यांदा १९५७ मध्ये मतदान झाले. या प्रक्रियेला आता ६६ वर्षे पूर्ण झाली आहेत. या ६६ वर्षांत सुरुवातीची फक्त १० वर्षेच सर्वसाधारण प्रवर्गातील उमेदवारांना केज मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली. १९५७ आणि १९६२ मध्ये हा मतदारसंघ अनुसूचित जातींसाठी आरक्षित होता. त्यानंतर १९६७ आणि १९७२ मध्ये तो सर्वसाधारण प्रवर्गासाठी खुला झाला. १९७८ पासून पुन्हा अनुसूचित जातींसाठी आरक्षित झाला आणि २००९ च्या पुनर्रचनेनंतर २०२८ पर्यंत असाच राहणार आहे. त्यामुळे ७१ वर्षांच्या इतिहासात फक्त १० वर्षे सर्वसाधारण उमेदवारांना संधी मिळाली, तर ५१ वर्षे अनुसूचित





जातीच्या उमेदवारांनी नेतृत्व केले.सुरुवातीचे नेतृत्व१९५७ मध्ये गोविंदराव गायकवाड विजयी झाले आणि १९६२ मध्येही त्यांनी यश मिळवले, अशा रीतीने सलग १० वर्षे त्यांनी मतदारसंघाचे नेतृत्व केले. १९६७ मध्ये मतदारसंघ सर्वसाधारण प्रवर्गासाठी खुला झाला आणि माजलगावचे सुंदरराव सोळुंके काँग्रेसचे उमेदवार म्हणून विजयी झाले. त्यांना राज्य मंत्रिमंडळात स्थान मिळाले आणि त्यांनी मतदारसंघात लक्षणीय विकासकामे केली. १९७२ मध्ये बाबुराव आडसकर यांनी ॲड. बापूसाहेब काळदाते यांचा पराभव करून विजय मिळवला, ज्यामुळे ते राज्यभर चर्चेत आले. १९७२ नंतर मतदारसंघ पुन्हा अनुसूचित जातींसाठी आरक्षित झाला. १९७८ मध्ये बी. एन. सातपुते, १९८० मध्ये गंगाधर स्वामी आणि १९८५ मध्ये पुन्हा बी. एन. सातपुते विजयी झाले. १९७८ ते १९९० या काळात या दोघांनी १२ वर्षे नेतृत्व केले, पण त्यांना विशेष ठसा उमटवता आला नाही. डॉ.विमल मुंदडा यांचा उदय आणि योगदान १९९० मध्ये भारतीय जनता पक्षाने उच्चशिक्षित आणि नवख्या डॉ. विमल मुंदडा यांना संधी दिली. त्यांनी बी. एन. सातपुते यांचा पराभव करून पहिला विजय मिळवला. त्यानंतर १९९५, २०००, २००५ आणि २००९ मध्ये डॉ. विमल मुंदडा यांनी सतत चढत्या मताधिक्याने विक्रमी विजय संपादन केले. त्यांना सलग २२ वर्षे केज मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली. या काळात त्यांनी राज्यमंत्रीपदापासून ते सार्वजनिक आरोग्य विभागाच्या कॅबिनेट मंत्रिपदापर्यंतचा चढता प्रवास केला. डॉ. विमल मुंदडा यांनी मतदारसंघात दिसणारी आणि लक्षात राहणारी विकासकामे केली. अंबाजोगाईला जिल्ह्याचा दर्जा मिळावा यासाठी त्यांनी मजबूत पायाभूत सुविधा उभ्या केल्या. मात्र, कॅन्सरच्या असाध्य आजाराने त्यांना ग्रासले आणि २०१२ मध्ये, अवजड उद्योग मंत्री म्हणून कार्यरत असताना त्यांनी जगाचा निरोप घेतला. त्यांच्या २२ वर्षांच्या कार्यकाळाने केज मतदारसंघाला सन्मान मिळवून दिला. पुढील नेतृत्व आणि वारसा २००९ च्या पुनर्रचनेनंतर मतदारसंघाची भौगोलिक परिसीमा बदलली आणि तो पुन्हा अनुसूचित जातींसाठी आरक्षित झाला. आजारी असूनही डॉ. विमल मुंदडा यांना ४० हजार मतांच्या प्रचंड बहुमताने निवडून देण्यात आले, परंतु त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनानंतर पोटनिवडणुकीत पृथ्वीराज साठे विजयी झाले. २०१४ मध्ये सौ. संगिता ठोंबरे यांनी विजय मिळवला, तर २०१९ मध्ये डॉ. विमल मुंदडा यांच्या स्नुषा नमिता मुंदडा यांनी संगिता ठोंबरे यांचा पराभव करून विजय संपादन केला. आज नमिता मुंदडा, नंदकिशोर मुंदडा आणि अक्षय मुंदडा यांचा संपर्क आणि कामगिरी पाहता २०२८ पर्यंत त्यांची पकड कायम राहील, असे वाटते. डॉ.विमल मुंदडा यांचा अविस्मरणीय ठसा डॉ. विमलताई मुंदडा यांनी १९९० ते २०१२ या २२ वर्षांत केज मतदारसंघाला नवी ओळख दिली. अंबाजोगाईच्या विकासासाठी त्यांनी उभे केलेले पायाभूत सुविधांचे जाळे अविस्मरणीय आहे.

# शांततामय नागपूरला हिंसेचे गालबोट!

संभाजीनगर जिल्ह्यातील खुलताबाद येथील औरंगजेबाची कबर हटविण्याच्या मागणीसाठी नागपूरमध्ये बजरंग दल व विश्व हिंदू परिषद यांच्या कार्यकर्त्यांनी सोमवारी सकाळी महाल येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात आंदोलन केले.या आंदोलनात मुस्लिम प्रतीकांचा अवमान केल्याचा आरोप करीत आंदोलकांविरूध्द गुन्हा दाखल करण्याची मागणी मुस्लिम समाजाच्या शिष्टमंडळाने पोलिसांकडे केली.परंतु चुकीची अफवा पसरल्याने महाल येथे तनाव वाढला व अशांतता निर्माण झाली.अशा परिस्थितीत पोलिस विभागाने दोन्ही गटांची समजूत घालून परिस्थिती शांत केली. परंतु रात्री अचानक तनाव वाढला व दोन गटांमध्ये दगडफेक सुरू झाली हा प्रकार एवढा टोकाला गेला की याचे रूपांतर हिंसक झाले व जाळपोळची घटना सुरू झाली.या घटनेमध्ये असामाजिक तत्वांचा समावेश असल्याचे स्पष्ट दिसून येते.देशातील नागपूर शहर हे शांततेच प्रतीक मानल्या जाते.याठीकाणी सर्वंच धर्माचे लोक एकोप्याने आणि आनंदाने रहातात. जेवढे सन राज्याच्या किंवा देशाच्या इतर भागात होत नसेल तेवढे सन व सांस्कृतिक कार्यक्रम नागपूरात होतात.परंतु राज्यात सध्याच्या परिस्थितीत औरंगाबादच्या कबरीचा वाद एवढा विकोपाला पोहोचला की शांततामय नागपूरमध्ये जाळपोळीची घटना दिसून आली व हिंसेचे गालबोट लागले.अशा हिंसक घटना स्थानिक समाज किंवा धर्माचे लोक कधीच करीत नाही. त्यामुळे १७ मार्चला २०२५ ला झालेली जाळपोळ व हिंसक वळण यात असामाजिक तत्वांचा सुनियोजित हात असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. दुःखद बाब म्हणजे जे आपले संरक्षक व रक्षणकर्ते पोलिस विभाग व सुरक्षा विभाग आहेत यांच्यावर सरळ हल्ला करने व दगडफेक करने ही बाब पुर्व नियोजित असल्याची या संपूर्ण घटनेवरून दिसून येते.जे कोणीही असेल ज्यांनी-सुरक्षा भंग करण्याचा प्रयत्न केला व सुरक्षा कर्मचाऱ्यांवर आणि अधिकाऱ्यांवर हल्ला केला अशा सर्वांना कठोर शिक्षा व्हायलाच पाहिजे.दुखःद बाब म्हणजे या हिंसाचारात ३३ पोलिस जखमी झाले ज्यात ३ उपायुक्त दर्जाचे पोलिस अधिकारी आहेत. एका अधिकाऱ्यांवर तर कुह्राडीने हल्ला केला व यात पाच नागरिक सुध्दा जखमी झाले ही अत्यंत गंभीर आणि चिंताजनक बाब आहे. महत्वाचा मुद्दा औरंगजेबाच्या कबरीवरून निर्माण झाला. औरंगजेबाच्या कबरी बद्दल राजकीय आरोप-प्रत्यारोप सुरू झाले.याची ठीनगी संपूर्ण महाराष्ट्रात हळूहळू वनव्यासारखी पसरायला लागली आणि औरंगजेबाची कबर हटली पाहिजे यासाठी महाराष्ट्रात लोकशाहीच्या माध्यमातून अनेक ठिकाणी आंदोलनाला सुरुवात झाली. परंतु ज्याठिकाणी कोणीही एकीन करू शकत नाही अशा शांततामय व सर्वधर्मसमभावाचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या नागपूरमध्ये दिनांक १७ मार्च २०२५ सोमवारला हिंसेच गालबोट लागले आणि हिंसा एवढी विकोपाला गेली की असामाजिक तत्वांनी दगडफेक व जाळपोळ करून नागपूरची शांतता भंग केली



रमेश कृष्णराव लांजेवार
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर),
६३ बी शिवनगर नागपूर-९.
मो.नं.९३२५१०५७७९.

ही नागपूरसाठी अत्यंत दुःखद व चिंताजनक बाब आहे.नागपूर ही राज्याची उपराजधानी आहेच सोबतच देशातील सुरक्षित ठिकाण म्हणून नागपूरची गणना संपूर्ण भारतात होते व भारताचा केंद्र बिंदू सुध्दा आहे. कारण याठिकाणी संघ कार्यालयात, दिक्षा भुमि, ताजुद्दीनबाबांचा दर्गा, चर्च, गुरूव्दारा इत्यादी अनेक मोठमोठी धार्मिक व सामाजिक संस्थाने व स्थळे आहेत. प्रत्येकांच्या सनाला अनेक धर्मांचे लोक आवजून सहभागी होतात म्हणूनच नागपूरला शांततेचे शहर म्हणून संपूर्ण भारतात ओळख आहे.१७ मार्चच्या हिंसक प्रकारामुळे शांततामय नागपूरला गालबोट लागल्याचे दिसून आले. या घटनेवरून स्पष्ट दिसून येते की नागपूरला हिंसेमध्ये झोकण्याचे काम असामाजिक तत्वांचे कारस्थान असल्याचे स्पष्ट झाले आहे. कारण देशातील कोणताही व्यक्ती असो जो व्यक्ती देशाच्या सुरक्षा कर्मचाऱ्यांवर किंवा अधिकाऱ्यांवर हल्ला करतो तो हल्ला संपूर्ण सुरक्षा विभावर,राज्यावर व देशावर झाल्याचे गृहित धरल्या जाते त्या पध्दतीने सुरक्षा विभागाची कठोर कारवाई सुरू आहे. अशा समाजकंटकांना सुरक्षा विभाग कदापि माफ करणार नाही. त्यापध्दती पोलिस विभागाची व सुरक्षा विभागाची मोहीम युध्दपातळीवर सुरू आहे. पोलीस विभागाने शांतता निर्माण करण्यासाठी मोठ्या संय्यमतेने काम केले व अनेक जखमा व वेदना सहन केल्या परंतु समाजकंटकांनी त्याचा गैरफायदा घेऊन पोलीस विभागालाच टारगेट बनवून त्यांच्यावरच हल्ला करत दगडफेक, जाळपोळ व हिंसेचे वातावरण निर्माण केले. तरीही सुरक्षा विभाग समाजाच्या रक्षणासाठी डगमगला नाही व समाजाची ढाल बनून उभे राहिले व संपूर्ण स्थीती नियंत्रणात आणुन शांतता निर्माण केली.याकरीता पोलिस विभाग व सुरक्षा विभागाला माझा कोटी कोटी सलाम! राज्यात औरंगजेबाच्या कबरी बद्दलचा जो मुद्दा आहे. याकरीता महाराष्ट्र तील ४८ खासदार व २८८ आमदारांनी एकत्र बसून सोडवावा किंवा केंद्र सरकार व राज्य सरकारच्या मदतीने कबर हटवावी. असे जर एकमताने होत असेल तर याचे स्वागत सर्वांनीच केले पाहिजे. औरंगजेब क्रुर होता त्यानी छत्रपती संभाजी महाराजांचा छळ करून हत्या केली.सोबतच त्यांनी आपल्या परिवारातील प्रत्येक व्यक्तीची हत्या करून गादी हस्तगत केली व बादशहा बनला.त्यामुळे राज्यातील किंवा देशातील कोणत्याही समाजाजवळ औरंगजेबाबद्दल आदर नसावा. यासाठी सरकारने व प्रशासनाने औरंगाबादच्या कबरीच्या बाबतीत योग्य तो निर्णय घ्यावा ज्याचे स्वागत सर्वच स्तरातून झाले पाहिजे. परंतु राज्यातील कोणत्याही राजकीय पुढाऱ्यांनी प्रक्षोभक किंवा चिथावणीखोर वक्तव्य टाळले पाहिजे जेणेकरून राज्यात कुठेही शांतता भंग होणार नाही याचीही काळजी घेतली पाहिजे.कारण ज्याप्रमाणे शांतता प्रस्थापित करणे सुरक्षा विभागाचे कर्तव्य आहे तेवढेच कर्तव्य राजकीय पुढाऱ्यांचे सुध्दा आहे असे मला वाटते. नागपूरच्या संपूर्ण समाज बांधवांना विनंती करतो की कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नका व शांतता बाळगून पोलिस विभागाला संपूर्ण सहकार्य करा हिच संपूर्ण धर्माकडुन व समाज बांधवांकडुन अपेक्षा जय हिंद!

# कोळगाव येथे 'न समजलेले आई-बाप' विषयावर व्याख्यानाचे आयोजन

## प्रा.वसंत हंकारे यांच्या व्याख्यानाला उपस्थित राहण्याचे कोळगाव ग्रामस्थांचे आवाहन

गेवराई : प्रतिनिधी

सुप्रसिद्ध व्याख्यानकार प्रा.वसंत हंकारे यांच्या ''बाप समजून घेताना, न समजलेले आई-बाप'' या हृदयस्पर्शी व्याख्यानाचे आयोजन गेवराई तालुक्यातील कोळगाव येथील श्रीराम मंदिराच्या प्रांगणात मंगळवार दि.२५ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता करण्यात आले. समस्त कोळगाव ग्रामस्थांच्या विद्यमाने विशेषतः शालेय तसेच महाविद्यालयीन युवक, युवती तसेच पालकांसाठी या खास कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी प्रसिद्ध व्याख्याते तथा समाज प्रबोधनकार प्रा. वसंत हंकारे यांच्या या व्याख्यानाला पालकांनी आपआपल्या किशोरवयीन मुलं, मुली यांना



घेऊन अवश्य उपस्थित राहावे, असे आवाहन कोळगाव ग्रामस्थांनी केले आहे.

सध्याचे युग हे सोशल मीडिया, मोबाईल, टेलिव्हिजनचे आहे. यामुळे आपल्या किशोरवयीन मुला-मुलींच्या मनावर विचित्र परिणाम होत आहेत. शाळा, कोचिंग क्लासेस, महाविद्यालय, कॉलेज समोर टवाळखोर रोड रोमिओ मुलींच्या पाठलाग करत असतात, असे आपण नेहमी पाहत असतो. यावर उपाय म्हणजे आपल्या मुलींचे प्रबोधन होणे गरजेचे आहे. जेव्हा किशोरवयीन मुली मनोमन विचार आत्मसात करतील तेव्हा समाजातील चित्र बदलेल आणि निश्चितच आई-वडिलांना मनस्ताप होणार नाही तसेच अनुचित प्रकारालाही आळा घालता येईल. या हेतूने सुप्रसिद्ध व्याख्याते तथा समूह समाज प्रबोधनकार प्रा. वसंत हंकारे यांचे आनंदी जीवन जगण्याचा अर्थ समजावून सांगणाऱ्या हृदयस्पर्शी व्याख्यान कोळगाव येथील श्रीराम मंदिर प्रांगणात मंगळवार दि.२५ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता आयोजित करण्यात आले असून आजच्या काळातील भरकटत चाललेल्या तरुणाईला समाजोपयोगी संदेश देणाऱ्या प्रा.हंकारे सरांच्या व्याख्यानाला परिसरातील माता-पालकांनी आपआपल्या शालेय, किशोरवयीन मुला मुलींना घेऊन आवर्जून उपस्थित रहावे, असे आवाहन कोळगाव ग्रामस्थांनी केले आहे.

# घरकुल योजनांमधील लाभार्थ्यांना एकसारखा निधी देण्याबाबत निर्णय घेऊ-मंत्री अतुल सावे



राज्यात राबविल्या जाणाऱ्या विविध घरकुल योजनांमधून लाभार्थ्यांना वेगवेगळे अनुदान दिले जाते. या योजनांना एकसारखे अनुदान देण्याबाबत निर्णय घेण्याचे निर्देश विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी दिले असून त्यानुसार मंत्रिमंडळाच्या बैठकीत याबाबत चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल, असे इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी विधानपरिषदेत सांगितले. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजनेतील पात्र लाभार्थ्यांना अनुदान मिळण्याबाबत प्रश्न उपस्थित केला होता. या अनुषंगाने झालेल्या चर्चेदरम्यान सभापती प्रा. शिंदे यांनी निर्देश दिले. सदस्य सर्वश्री विक्रम काळे, एकनाथ खडसे, श्रीमती भावना गवळी यांनी या चर्चेत सहभाग घेतला. इतर मागास बहुजन कल्याण मंत्री श्री. सावे म्हणाले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजनेतील पात्र लाभार्थ्यांना सध्या चार टप्प्यांमध्ये १.२० लाख रुपये दिले जातात. ही रक्कम वाढवून देण्याबाबत तसेच या घरकुलांना पाच ब्रास वाळू देण्याबाबत देखील मंत्रिमंडळाच्या बैठकीत चर्चा करण्यात येईल. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वैजापूर तालुक्यातील ३२९ लाभार्थ्यांची नोंदणी आवास सॉफ्ट प्रणालीवर करण्यात आली असून त्यापैकी २४१ लाभार्थ्यांना मंजुरी प्रदान करण्यात आली आहे. त्यापैकी १७१ लाभार्थ्यांना १५ हजार रुपयांचा पहिला हप्ता वितरित करण्यात आला असून उर्वरित लाभार्थ्यांची पी एफ एम एस प्रणालीवर बँक खाते पडताळणी प्राप्त होताच पहिला हप्ता वितरित करण्यात येईल, असे श्री. सावे यांनी यावेळी सांगितले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर



# जनता जातीयवादी नाही, पुढारी आहेत; नितीन गडकरी

अमरावती । प्रतिनिधी सर्वसामान्य जनता जातीयवादी नाही तर पुढारी जातीवादी आहेत. हे पुढारी आपल्या स्वार्थासाठी जात उभी करतात असं वक्तव्य केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज (२२ मार्च) अमरावतीत केलंय. अमरावती येथे श्री शिवाजी शिक्षण संस्थेद्वारे डॉ पंजाबराव देशमुख स्मृती पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता, यावेळी नितीन गडकरी यांनी आपल्या भाषणात असे वक्तव्य करत जातीय व्यवस्थेवर भाष्य केलं आहे. शिवाय नागपुरातील हिंसाचाराची घटना घडली असताना त्यांच्या या वक्तव्याला विशेष महत्व प्राप्त झाले आहे. माझं राजकारण माझ्या हिशोबाने चालेल, तुमच्या हिशोबाने नाही- नितीन गडकरी या कार्यक्रमात पुढे बोलताना नितीन गडकरी म्हणाले की, माझा मुलगा आहे म्हणून त्याला राजकारणात स्थान मिळेल हे मला मान्य नाही. त्यांनी त्याच्या कर्तुत्वावर स्थान निर्माण करावे. आमदाराच्या पोटातून आमदार नाही झाला पाहिजे, खासदाराच्या पोटातून खासदार नाही झाला पाहिजे. त्यांनी त्याच्या कर्तुत्वावर स्थान निर्माण करावे. आमदाराच्या पोटातून आमदार नाही झाला पाहिजे, खासदाराच्या पोटातून खासदार नाही झाला पाहिजे. आमदार खासदारांनी म्हणायच्या ऐवजी जनतेने आणि कार्यकर्त्यांनी जर म्हटलं तर त्यांना अधिकार आहे. जे लोक आपलं कर्तृत्व सिद्ध करतात त्यांना हा पूर्ण अधिकार आहे. कुणाचा मुलगा, मुलगी असणे गुन्हा नाही. आज आपल्या सामाजिक जीवनामध्ये राजकारणाचा अर्थच समाजकारण आहे.

# जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांचा गुंडगिरी करणाऱ्याला दणका! गुंडाची हर्सूल कारागृहात रवानगी

बीड : बीड जिल्हयातील सार्वजनिक सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी जिल्हयाचे पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉंवत यांनी जिल्हयाची धुरा सांभाळल्या पासुन शर्थीचे प्रयत्न चालवले आहेत. त्यांना बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी मा. श्री. अविनाश पाठक यांची खंबीर साथ लाभली आहे. बीड जिल्ह्यातील गुंडगिरीचे व गुन्हेगारीचे व वाळु माफीयाचे समूळ उच्चाटन करण्याचा उदात्त दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून चझऊअ कायद्या अंतर्गत बऱ्याच गुन्हेगारांवर व गुंडावर कार्यवाही करण्याचे योजिले आहे. त्या अनुषांने पोनि पो.स्टे. परळी ग्रामीण यांनी दिनांक ०४.०३.२०२५ रोजी इसम नामे मोहन दौलत मुंडे रा. क्रांतीनगर, अंबाजोगाई ता. अंबाजोगाई जि.बीड याचे विरुद्ध चझऊ- कायद्या अंतर्गत स्थानबद्ध करण्याचाबतचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक बीड यांच्या मार्फतीने मा. जिल्हादंडाधिकारी साहेब बीड यांना सादर केला होता. सदर स्थानबध्द इसमाविरुध्द पो. ठा. परळी ग्रामीण येथे दिवसा व रात्री घरफोडी करणे, खंडणी मागणे, मारहाण करणे, शिवीगाळ करणे, जिवे मारण्याच्या धमक्या देणे, या व अशा गंभीर स्वरुपाचे एकुण ०७ गुन्ह्याची नोंद पोलीस अभिलेखावर आहे. सदरील इसम हा गंभीर स्वरुपाचे गुन्हे करण्याच्या सवईचा असल्याने परळी व अंबाजोगाई पोलीसांची त्याचेवर बऱ्याच दिवसांपासुन करडी नजर होती. तसेच सदर इसमाने आपले वर्तन सुधारावे म्हणून यापुर्वी उझउ ११० प्रमाणे दि.२६.११.२०२२ रोजी त्याचेवर प्रतिबंधक कारवाई करण्यात आली होती. परंतु सदर इसम हा प्रतिबंधक कारवाईस न जुमानता पुन्हा चढत्या क्रमाने गंभीर गुन्हे करण्याचे चालुच ठेवून होता त्याची अंबाजोगाई व परळी भागात प्रचंड दहशत आहे. त्यांचे विरुध्द सर्व सामान्य लोक फिर्याद अथवा साक्ष देण्यास समोर येत नाहीत. तो सर्वसामान्य लोकांना व व्यापाऱ्यांना त्रास देवून दहशत निर्माण करुन गुन्हे करत होता. सदर प्रकरणात श्री. अविनाश पाठक जिल्हाधिकारी तथा दंडाधिकारी बीड यांनी दिनांक १८.०३.२०२५ रोजी सदर प्रकरणाच्या अनुषंगाने एम.पी. डी.ए. कायद्याअंतर्गत आदेश पारीत करून बीड जिल्ह्यातील सार्वजनिक सुव्यवस्था अबाधीत

# चौसाळा येथे महाराष्ट्र ग्रामीण बँकेचा शुभारंभ

अनेक दिवसापासून चौसाळा येथे नॅशनल बँकेची दुसरी शाखा असावी अशी मागणी होती त्यां मागणीनुसार चौसाळा ता. जि. बीड येथे महाराष्ट्र ग्रामीण बँकेची शाखा शुभारंभ मा.जिल्हाधिकारी अविनाशजी पाठक यांच्या शुभ हस्ते दिनांक २० ०३ २०२५ रोजी संपन्न झाला मा. जिल्हाधिकारी पाठक साहेब यांनी आपल्या भाषणातून सध्याचे युग हेऑनलाइन चे आहे अनेक नागरिक आपले व्यवहारऑनलाइन द्वारेच करतात ही एक चांगली बाब आहे सर्व नागरिकांनी विशेषता शेतकऱ्यांनी आपले खाते नॅशनल बँकेतून काढून विविध योजनेचा लाभ घेण्यासाठी सदर बँकेत खाते असणे आवश्यक आहे. असे सुचविले या शुभारंभ कार्यक्रम कार्यक्रमाला बँकेचे क्षेत्रीय व्यवस्थापक शिवशंकर कावेरी बँकेचे व्यवस्थापक किरण कुमार साळुंखे अधिकारी बँकेचे कृषी अधिकारी गजानन सानपयांच्यासह गावातील सर्व नागरिक सरपंचन विविध क्षेत्रातील मान्यवर व पत्रकारहे उपस्थित होते या कार्यक्रमा नंतर माननीय जिल्हाधिकारी पाठक साहेब चौसाळा आले असता एका छोटेखानी कार्यक्रमात त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला गावातील सरपंचपती बाबुशेठ लोढा उपसरपंचअंकुश राव कळासे सामाजिक कार्यकर्ते मोहन झोडगे व तागड आदींनी पाठक यांचे शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला यावेळी बीडचे तहसीलदार श्री शेळके साहेब व मंडल अधिकारी जायभाय साहेब तलाठी निर्मळ साहेब व पत्रकार एनटी वाघमारे विकास सर्वज्ञ आदी नागरिक उपस्थित होत

# धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी २० हजार रुपयांचा बोनस-उपमुख्यमंत्री अजित पवार

मुंबई-प्रतिनिधी राज्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे आहे. धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी दोन हेक्टरच्या मर्यादेत २० हजार रुपयांचा बोनस देण्यात येणार असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत वित्त विभागाच्या चर्चेवरील उत्तरात केली. या बोनसचा लाभ पूर्व विदर्भातील धान उत्पादक शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात होणार आहे. या अर्थसहाय्य वाटप लवकरच करण्यात येणार असल्याचेही उपमुख्यमंत्री पवार यांनी सांगितले. उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, राज्याचे स्थूल उत्पन्न ४९ लाख कोटी ३९ हजार आहे. राज्याची महसुली तुटी १ टक्क्यांच्या आत आहे. राज्याचा खर्च ७७.२६ टक्के झाला आहे. पुढील वर्षी २०२५ - २६ मध्ये १०० टक्के महसूल जमा करण्याचे शासनाचे उद्दिष्ट राहणार आहे. राज्याचे उत्पन्न वाढविण्यासाठी शासन विविध पातळ्यांवर काम करीत आहे. महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या माध्यमातूनही याबाबत प्रयत्न करण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या माध्यमातून उत्पन्न वाढवण्यासाठी केरळच्या धर्तीवर



उपाययोजना सुचविण्यासाठी लोकप्रतिनिधींची समिती गठित करण्यात येईल. या समितीचे अध्यक्ष सदस्य सुधीर मुनगंटीवार असतील. समिती गठित झाल्यानंतर एक महिन्याच्या आत समिती अहवाल सादर करेल. धान खरेदीच्या संदर्भामध्ये उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, याबाबत ३१ मार्चपर्यंत बैठक घेण्यात येईल. धान खरेदीमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी शासन सर्वतोपरी कार्यवाही करेल. ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून पाणंद रस्त्यांच्या निर्मितीकरिता निधी उपलब्ध करून देण्यात येईल.यामध्ये निधीची कुठल्याही प्रकारची कमतरता ठेवण्यात येणार नाही. सन २०२५ - २६ या आर्थिक वर्षासाठी अर्थसंकल्पात वित्त विभागाकरिता १ लाख ८४ हजार २८७ कोटी रुपये रकमेच्या अर्थसंकल्पीय मागण्या मंजूर करण्यात आल्या आहेत. तसेच अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या १३ हजार ८१० कोटी ६७ लाख ५९ हजार रुपयांच्या, नियोजन विभागाच्या कार्यक्रम खर्चासाठी ७ हजार ८८७ कोटी ४५ लाख व अनिवार्य खर्चासाठी २०६ कोटी ५६ लाख तसंच जिल्हा वार्षिक योजनेच्या कार्यक्रमांतर्गत २० हजार १६५ कोटी एवढ्या रकमेच्या अनुदानाच्या मागण्या मंजूर करण्यात आल्या.

# बालरंगभूमी परिषदेतर्फे आरोग्य शिबिर संपन्न



जालना । प्रतिनिधी बाल रंगभूमी परिषद जालना शाखेच्या वतीने गुरुवारी ( ता. २० ) जिल्हा सामान्य रुग्णालयात आरोग्य शिबिर घेण्यात आले त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. डॉ.राजेंद्र पाटील यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन झाले. यावेळी डॉ. राजेंद्र गाडेकर, राजेश राऊत , परिषदेच्या जिल्हाध्यक्षा, अभिनेत्री वैशाली दाभाडे, नरेंद्र माटोले, , यांची उपस्थिती होती शिबिरात तज्ञ डॉक्टरांनी रक्तातील साखरेचे प्रमाण,डोळे, मधुमेह, गुडघे, पाठ,मान, पोट,कंबर, पोटाचे विकार, इ. सी. जी. आदी तपासणी करून रुग्णांना मोफत औषधी वितरित करण्यात आली नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला.

# एकमेव यश हे हजारो प्रश्नांवर उत्तर ठरलं-खुशबू नरुका

संघर्ष जिद्द चिकाटी संयम हे जेव्हा मिळून येतात तेव्हा यश हे लखलखत. हे फक्त आपल्याला वाचण्यातच पाहायला मिळत असते. पण याच जिवंत उदाहरण आज खुशबू नरूका यांनी राजस्थानलाच नव्हे तर भारत देशाला सुद्धा अनुभवायला मिळवून दिलं. प्राथमिक शिक्षण हे राजस्थानच्या शाळेमध्ये झाल्यानंतर खुशबू नरुका या २०२२ मध्ये दिल्ली येथे आल्या भारतामधली सर्वात अवघड समजली जाणारी यूपीएससी या परीक्षेतून जिल्हाधिकारी होण्यासाठी तीन वेळा प्रयत्न केले पण या प्रयत्नात त्यांना अपयश आलं. पण अखेर १९ मार्चला निकाल लागला आणि या डेप्युटी ऑफिसर म्हणून यांची भारताच्या सेंट्रल सेक्रेटरी करून



नियुक्ती झाली. सण असो उत्सव असो कधीही आणि कितीही घरची आठवण आली तरीही आपली पदनियुक्तीच ही आपल्या परिवाराची सुखाची चावी आहे हे समजून कोणत्याही सण उत्सवाला न जाता खुशबू नका यांनी दिवस रात्र एक करून जिद्दीने तळमळीने अभ्यास केला. अगर हम अदृश्य है, तो समझिये हम असरदार है हे वाक्य त्यांनी खरं करून दाखवलं. वय वर्ष फक्त २७ यात अनेक वेळा अपयश संघर्ष करावा लागला या अपयशातूनच समाजातील भिन्न विभिन्न विचारसरणी असणारे लोक यांचे टोमणे सुद्धा सहन करावे लागले पण आज तेच समाजातील लोक त्यांचा सत्कार करताना स्टेटस ठेवताना पाहायला मिळत आहेत. पण हा संघर्ष इथेच न थांबता अजूनही जिद्दीला पेटवून खुशबू नरूका तळमळीने यशाची गवसणी घालतील. सितारों के आगे जहाँ और भी है, राजस्थानच्या या लेकीने राजस्थानमध्येच नव्हे तर महाराष्ट्रात देखील आणि भारतामध्ये सुद्धा आपल्या कर्तुत्वाने सर्वांच्या माना उंचावले आहेत

# चिंच झोडपणी हंगाम सुरू चिंच फोडुन बेरोजगारीवर मात : डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश : बीड तालुक्यातील लिंबागणेश परीसरात चिंच झोडणीचे काम जोरदार सुरू असुन चिंच फोडणीच्या कामामुळे ग्रामीण भागातील महिला मजुरांच्या हाताला काम मिळत आहे. चिंच फोडणीसाठी १२ रूपये किलो दर मिळत असुन एक महिला दिवसातुन २५ ते ३० किलो चिंच फोडणी करत असल्याने ३५० रुपयांपर्यंत रोजंदारी पडत असल्याचे वाघमारे यांनी सांगितले. शेतमजुर, महिला वर्ग आर्थिक संकटात असताना अशावेळी चिंच फोडणी कामाने महिलांच्या हाताला काम मिळाल्याने बेरोजगारीचा प्रश्न काही प्रमाणात मिटला आहे. चिंचा झोडण्याचे काम फेब्रुवारी मध्ये सुरू होऊन मे महिन्यांपर्यंत संपते. या ४ महिन्यात ग्रामीण भागात यामुळे मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होते.झाडावर चढुन बांबुने झोडपुन चिंचा खाली पाडणे, पडलेल्या चिंचा वेचणे, त्यांच्यावरील टरफल बाजुला करणे,चिंचा फोडुन गर व चिंचोके वेगळे करणे आदी कामे कुटुंबातील महिला व मुले करतात. झाडांच्या फांदीवरून धोकादायक पद्धतीने झोडपणी करावी लागते.गेल्या १५ वर्षांपासून आम्ही भावंडे चिंचा झोडण्याचा व्यवसाय करत असल्याचे लिंबागणेश येथील अजय परमेश्वर थोरात यांनी सांगितले. गेल्या वर्षीच्या मानाने यावर्षी चिंचाला बाजारभाव चांगला मिळत असुन नगर येथील व्यापारी जागेवर येऊन माल घेऊन जातात.फोडलेल्या चिंचेला प्रतिकिलो ११ रूपये बाजारभाव मिळतोय. यावर्षी चिंचेच्या झाडांना चिंचेचे प्रमाण कमी असल्याने यावर्षी आवक कमी प्रमाणात असल्याचे लिंबागणेश येथील चिंचेचे व्यापारी चंद्रकांत आवसरे यांनी सांगितले.




बीड :शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या समाज कार्याला प्रभावित होऊन बीडमधील असंख्य तरुणांनी एकत्रित येऊन समाजसेवेचे कार्य करण्यासाठी अनिलदादा जगताप फाउंडेशनची स्थापना केली. या फाउंडेशनच्या माध्यमातून समाजातील गरजू घटकांना मदतीचा हात दिला जातो. याबरोबरच समाजपयोगी उपक्रम राबविले जातात.

# पवित्र रमजान महिन्या मध्ये लोकांना नागरी सुविधा द्या

बीड - नेकनूर येथील पवित्र रमजान च्या महिन्यात रोजा, गावातील प्रत्येक डीपीचे अर्थिंगला ग्रामपंचायत ने टँकरद्वारे पाणी टाकावे सय्यद शोहिब उपवासअसल्यामुळे लाईटची अत्यंत आवश्यकता आहे त्याकरिता दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सय्यद शोहेब आमदार भारतीय जनता पार्टी बीड जिल्हा अल्पसंख्यांक सरचिटणीस यांच्या नेतृत्वात दिनांक १,१,२०२५, २५ रोजी पाच सहाशे लोकांच्या सह्यांचे निवेदन जिल्हाधिकारी बीड, माननीय नामदार पंकजाताई मुंडे पर्यावरण व दूध विकास मंत्री महाराष्ट्र राज्य, माननीय नामदार अजित दादा पवार पालकमंत्री बीडअधीक्षक अभियंता महावितरण कंपनी बीड,कार्यकारी अभियंता महावितरण कंपनी विभाग बीड, उपकार्यकारी अभियंता ग्रामीण महावितरण कंपनी बीड, तहसीलदार साहेब तहसील कार्यालय बीड, पोलीस अधीक्षक साहेब बीड, या सर्व वरिष्ठ अधिकारी यांना लोड सीटिंग बंद करावी व कमी दाबाची लाईट येत असल्यामुळे पंखे सुद्धा फिरत नाही व उच्च दाबाची लाईट द्यावी व होणारे रात्रंदिवस विजेचे लपंडा म्हणजे लाईटचा येणारा पूर्ण गाव लाईट मुळे कंटाळलेला आहे त्याकरिता एक महिन्याचे पवित्र रमजान मध्ये लाईट जाऊ नये म्हणून सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांना पाच ते सहाशे लोकांच्या सह्या चे निवेदन देण्यात आले होते २,३,२०२५, महावितरण कंपनीचे नेकनूर चे सहाय्यक लाईट मेन यांनी तुमची मागणी आम्ही वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा केलेली आहे व पवित्र रमजानच्या एक महिन्यात लोड शूटिंग बंद करेल व विजेचे लपंडा होणारे व उच्च दाबाची लाईट देऊ असे लेखी दिल्यानंतर लोकशाहीच्या मार्गाने होणारे रास्ता रोको आंदोलन मागे घेण्यात आले पण नेकनूर चे सहाय्यक लाईट मेन ने असे सांगितले की उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे गावातील प्रत्येक डीपीचे अर्थिंगला पाणी टाकावे कारण उच्च दाबाची लाईट मिळेल व लाईट जाणार नाही आपण नेकनूर ग्रामपंचायतला सांगावे, ग्रामपंचायतचे या अगोदर सरपंच काही सदस्यांना सांगितले पण दहा-बारा दिवस उलटले तरी पाणी टाकण्यात आले नाही आज दिनांक १८,३,२०२५, रोजी नेकनूर ग्रामपंचायत सरपंच सुंदर जी लांडगे यांना लेखी निवेदन दिले व त्यांनी उद्या टँकरद्वारे प्रत्येक डीपी चेअर्थिंगला पाणी टाकते असे आश्वासन दिले जर दोन दिवसात टँकरद्वारे पाणी नाही टाकले तर लोकशाहीच्या मार्गाने तीर्व आंदोलन करण्यात येईल असा इशारा सय्यद शोहिब आमदार वरिष्ठ नेते व समाजसेवक भारतीय जनता पार्टी बीड जिल्हा अल्पसंख्यांक सरचिटणीस इशारा दिलेला आहे.

# महात्मा मोठा की भारतरत्न ? छगन भुजबळ यांच्या सवालाने नवा वाद ?

जळगावात मंत्री छगन भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली ओबीसींचा मेळावा झाला. महात्मा फुले यांना अलिकडे काही मंडळी भारत रत्न पुरस्कार द्यावा म्हणून मागणी करीत आहेत याचा उल्लेख करीत मंत्री छगन भजबळ म्हणाले की मग महात्मा गांधी यांना भारतरत्न द्या ना ? का देत नाहीत?. ज्योतिबा फुले महात्मा आहेत. महात्मा मोठा कि भारतरत्न ? महात्मा किती आहेत ? भारतरत्न किती आहेत ? असा सवाल छगन भुजबळ यांनी केला, त्यानंतर ते म्हणाले की महात्मा आणि क्रांतीज्योती हेच शब्द आम्हाला प्रिय आहेत. त्यानंतर छगन भुजबळ यांनी घटनाकार डॉ.बाबासाहेब यांनी घटना लिहीली आहे. जगातील अनेक देश भारतीय घटनेचा अभ्यास करुन संविधान तयार करतात अशी पुस्ती जोडली. छगन भुजबळ पुढे म्हणाले की अण्णासाहेब आर्थिक विकास महामंडळ 750 कोटी दिले... द्या त्यांना आमचा विरोध नाही. परंतू ओबीसी महामंडळा पाच कोटी कसे ? मराठा समाजासाठी काम करणाऱ्या सारथीला 515 कोटी दिले. मग महाज्योतीला 325 कोटी का? मी मुख्यमंत्र्यांना जाऊन भेटलो ते बोलले की जेवढे पैसे इकडे दिले तेवढेच पैसे तुम्हाला दिल्याशिवाय राहणार नाही



असे आश्वासन मला मिळाल्याचे भुजबळ म्हणाले. हे होत असते परंतू जागरुक रहायला पाहीजे. पण लोक घाबरतात. निवडणूक लढवायची असते. त्या मोठ्या समाजाला कसे दुखवायचे ? जालन्याचे सो कोल्ड लीडर जालन्याचे सो कोल्ड लीडर येवल्यात फक्त येऊन बसले आणि फक्त छगन भुजबळ यांना पाडा असा प्रचार करीत राहीले. येवल्यात येऊन बसले पण येवल्याचे लोक हुशार त्यामुळे २५ हजार ते तीस हजार मताधिक्य कमी झाले. ओबीसी समाजावर एवढाही अन्याय करु नका की हा समाज एके दिवशी एवढा जागरुक होईल की पक्षाला विसरुन जाईल असा इशारा भुजबळ यांनी यावेळी दिला. मध्यंतरी एक आदेश आला की ग्रामपंचायतीच्या जागा कमी होत आहेत. भाटीया कमिशनने हा अहवाल एसी रुममध्ये बसुन तयार केला. भाटीया कमिशनची ती चूक होत होती. भाटीया कमिशनचा रिपोर्ट आम्हाला मान्य नाही छगन भुजबळ पुढे म्हणाले की सिन्नरच्या एका गावात शून्य ओबीसी दाखवले होते. आम्ही आमचे लोक पाठवले तर त्या ग्रामपंचायचीचा सरपंच ओबीसी होता. भाटीया कमिशनचा रिपोर्ट आम्हाला मान्य नाही. या अहवालानंतर १२ ठिकाणी निवडूक झाल्या आणि शुन्य ओबीसी होते. मग मध्य प्रदेशातील इतर राज्यातील निवडणूका आल्या आता काय करणार ? मग शिवराज सिंह चौहान केंद्रात गेले त्यांनी काहीतरी करुन हा निर्णय थांबवल्याचे भुजबळ यावेळी म्हणाले.

# माजलगावात आणखी एका मल्टीस्टेट बँकेत घोटाळा

माजलगाव। प्रतिनिधी जिल्ह्यातील माजलगाव शहरातील एका ठेवीदाराची ४० लाख २५ हजार ३६३ रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी धुनकेश्वर अर्बनचे अध्यक्ष यादव व उपाध्यक्ष रोडगे यांच्या विरोधात माजलगाव शहर पोलिस ठाण्यात २० मार्च रोजी रात्री उशिरा गुन्हा दाखल झाल्याने खळबळ उडाली आहे. माहितीनुसार, ठेवीदार त्रिंबक म्हतारबा यादव (रा. मोठीवाडी तहसील माजलगाव जिल्हा बीड) (६५) यांनी माजलगाव शहर पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, धुनकेश्वर अर्बन निधी लिमिटेड माजलगाव शाखे मध्ये मी ४० लाख २५ हजार ३७३ रुपयांच्या ठेवी धुनकेश्वर अर्बन मध्ये ठेवल्या होत्या परंतु काही महिन्यांपासून धुनकेश्वर अर्बन ला कुलूप असल्यामुळे आमची फसवणुक झाली आहे याची खात्री पटल्याने व ४० लाख २५ हजार ३६३ रूपयाची फसवणूक प्रकरणी त्रिंबक यादव यांच्या फिर्यादीवरून धुनकेश्वर अर्बनचे अध्यक्ष शिवहरी अशोक यादव (वय ३६) व उपाध्यक्ष सचिन पांडुरंग रोडगे (वय ३७) (रा. बेलगाव शहर माजलगाव जवळगाव माजलगाव) यांच्याविरुद्ध माजलगाव शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे त्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक दिंडे करीत आहेत. अजूनही कार्यरत आहे.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
रविवार २३ मार्च २०२५
https://lokaarambh.com



# भाविकांच्या वाहनाचा बीड जवळ भीषण अपघात





तुळजापूर येथे दर्शनासाठी जात असलेल्या नाशिक जिल्ह्यातील भाविकांचे वाहन पुलाला धडकून भीषण अपघात झाल्याची घटना आज पहाटे बीड-गेवराई रस्त्यावर घडली आहे. या अपघातात दोन ठार आणि सातजण गंभीर जखमी झाले आहेत. लोणारे कुटुंबावर काळाने झडप घालून दोघांना कायमचे हिरावून नेले आहे. जखमी मध्ये तीन लहान मुलं आणि मयतमध्ये एका ५ वर्षीय चिमुकलीचा समावेश आहे. योगेश पोपट लोणारे ( वय ४० वर्ष), इश्वरी रामेश्वर लोणारे ( वय ५ वर्ष) असे मयतांची नावे असून पूजा रामेश्वर लोणारे ( वय २५ वर्ष), पूनम योगेश लोणारे (वय ३० वर्ष), समर्थ योगेश लोणारे (वय १० वर्षं), श्रावणी योगेश लोणारे (वय ४ वर्ष), शंभू योगेश लोणारे (वय १७ वर्ष), रामेश्वर पोपट लोणारे (वय ३७ वर्ष), दत्तात्रय सोमनाथ अडवाई ( वय ४५ वर्षं) असे सातजण गंभीर जखमी असून हे सर्व रा. सिन्नर पान २ वर (जि.नाशिक) येथील रहिवासी आहेत. ते सिन्नर येथून तुळजापूर येथे इको या चारचाकी कार क्र. एम.एच. १५ एच एम ६७१६ लोणारे

## आ.सुरेश धसांनी गोरगरीब रुग्णांची दखल घेत सभागृहात चांगला विषय मांडला

# अण्णा तुम्ही आता 'गब्बर' ची भूमीका घेतल्या शिवाय या मेडिकल टोळ्या व डॉक्टरांचा धंदा बंद होणार नाही

## औषध गोळ्या कंपन्या अन् डॉक्टर यांचे लागेबांधे असल्याने होतेय मोठी लूट

आरोग्य हा जनतेच्या अत्यंत जिव्हाळ्याचा आणि न टाळता येणारा प्रश्न आहे. प्रत्येकाला आरोग्याच्या समस्येला तोंड द्यावे लागते. शहर असो की गाव कोणत्याही ठिकाणी सगळी दवाखाने ही नेहमीच गर्दीने भरून गेलेली दिसतात. लोकांची गरज लक्षात घेऊन, विविध दवाखाने आणि त्यांचे मेडिकल यामधून मोठी लूट केली जात असल्याची अनेक प्रकरणे समोर आलेली आहेत. हाच अत्यंत महत्त्वाचा आणि सर्वांच्या जिव्हाळ्याचा असलेला विषय आमदार सुरेश धस यांनी उचलून धरला आणि कशा पद्धतीने सामान्य जनतेची त्यातली त्यात गोरगरिबांची लूट होत आहे हे सभागृहाला सांगितले. ज्यांचा दवाखाना त्यांचेच मेडिकल आणि जेवढे दवाखान्याचे बिल तेवढेच मेडिकलचे बिल होत असल्याचे त्यांनी मांडले. यावर सरकारने अंकुश ठेवावा आणि याबाबत काहीतरी नियमावली तयार करावी असा आग्रह त्यांनी धरला. आमदार सुरेश धस हे नेहमीच सामाजिक आणि जनतेशी निगडित असलेले प्रश्न उचलत असतात. मेडिकल आणि एकूणच आरोग्याचा प्रश्न त्यांनी जो आता मांडला आहे तो अत्यंत महत्त्वाचा



आहे. आरोग्याच्या बाबतीत सर्वत्रच लूट होताना दिसत आहे. उपचार करून घेण्याशिवाय लोकांकडे पर्याय नसतो आणि नेमका त्याचाच फायदा घेतला जातो. वेगवेगळ्या तपासण्या पासून ते प्रत्यक्ष उपचार आणि मग औषध गोळ्या अशा सगळ्या टप्प्यावर ही लूट होताना दिसत आहे.

### कंपनी बदलली की, औषधांची किंमत बदलते

औषध, गोळ्या निर्माण कंपन्यांवर कोणाचे अंकुश आहे की, नाही असा नेहमीच प्रश्न पडतो याला कारणही तसेच असून, सेम कंटेंट असलेले औषधांची किंमत कमीजास्त आहे. औषध आणि प्रमाण समान फक्त कंपनी बदलली की, त्याची किंमत बदलते, यात थोडे थोडके फरक नाही तर प्रत्येक गोळी मागे ४ रु. पासून तब्बल १५ रुपयांपर्यंत फरक आहे. अशा तऱ्हेने १० गोळ्यांच्या एका स्ट्रीप मागे तब्बल ४० ते १५० रुपयांचा फरक पडतो. याकडेही शासनाने लक्ष द्यावं, तसेच देशात इलेक्ट्रोल बाँडचा प्रश्न गाजवल्यानंतर प्रत्येक औषध आणि गोळ्यांची मोठी दरवाढ झाली. याकडेही लक्ष देण्याची गरज आहे.

यामध्ये आणखी एक महत्त्वाचा विषय आहे तो म्हणजे औषध गोळ्या कंपन्यांकडून आपल्या प्रतिनिधी मार्फत थेट डॉक्टरांशी संपर्क केला जातो. आपण तयार केलेल्याच औषध गोळ्या लिहून द्याव्यात असा आग्रह डॉक्टरांकडे धरला जातो आणि यासाठी डॉक्टरांना भरमसाठ कमिशन दिले जात असल्याचे सांगण्यात येत आहे. दर्जा कसा आणि कोणता याचे काही प्रमाण नाही असेल तरी ते सामान्यांना समजायला मार्ग नाही. डॉक्टर ज्या कंपन्याचे औषध लिहून देईल तेच घेणे क्रमप्राप्त ठरते. सध्या तरी यावर कोणाचे काही नियंत्रण दिसत नाही

# हिंदू नववर्ष स्वागतासाठी मंदिरांनी पुढाकार घ्यावा, अर्चक पुरोहित संघटनेचे आवाहन

बीड हिंदू नवीन वर्ष गुढीपाडव्यापासून म्हणजेच ३० मार्चपासून २० एप्रिल पर्यंत दोन अभियानांचे आयोजन विश्व हिंदू परिषद व मंदिर अर्चक पुरोहित आयामाने केले आहे केले आहे. गुढीपाडव्याच्या दिवशी दिनांक ३० मार्चला प्रत्येक मंदिराने पुढाकार घेऊन हिंदू नववर्षाचे स्वागत करावे तसेच गुढीपाडवा ते २० एप्रिल या काळामध्ये तीन अपरिचित मंदिरांचे दर्शन घेऊन मूर्तीवर तेथे कुंभातील गंगाजलाने जलाभिषेक करावा.या दोनही कार्यक्रमात हिंदू समाजाने, तसेच वेगवेगळ्या धार्मिक संस्था, संघटना, मंदिरे, संत, धर्माचार्य, पुरोहित, पुजारी, विश्वस्त, भाविक यांनी मोठ्या प्रमाणावर सहभागी व्हावे, असे आवाहन विश्व हिंदू परिषद मंदिर अर्चक पुरोहित संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी केले आहे. सध्या हिंदू नववर्ष ५१२६ सुरू आहे. येत्या चैत्रशुद्ध प्रतिपदे पासून नवीन वर्ष सुरू होईल ते राहील ५१२७ प्राचीन शास्त्रीय हिंदू कालगणना पुन्हा प्रस्थापित व्हावी यासाठी मंदिरांनी आपल्या शक्तीनुसार हिंदू घरांवर लावण्यासाठी भक्तांना किमान शंभर, पाचशे, हजार भगवे ध्वज वाटप करणे.,प्रत्येक मंदिरावर किमान दोन मीटर भगवा ध्वज लावावा तत्पूर्वी,या ध्वजाचे पूजन आसपासच्या विविध समाजातील ११ किंवा , तरुण जोडप्यांच्या हस्ते व्हावे. ३ गुढीपाडव्याच्या दिवशी मंदिर परिसरात नवीन वर्ष स्वागत शोभायात्रा काढावी. किंवा जाहीर कार्यक्रम करावा., आपल्या मंदिर परिसरातील अतिशय गरीब, मजूर, मागास अशांसाठी मिठाईवाटप, कपडे वाटप, असा काही ना काही त्यांना समर्थ करणारा सेवा कार्यक्रम करावा तसेच हिंदू समाजाला प्रामुख्याने नवीन पिढीला मंदिरांशी घट्ट पुन्हा जोडणे.मंदिरांविषयी जनजागृती, मंदिर विचाराच्या/जीवनाच्या केंद्रस्थानी आणणे आणि या निमित्ताने मंदिरांची मंदिर गणना, पुजारी गणना हे तीन उद्देश या अभियानाच्या मागे आहेत. गुढीपाडवा ३० मार्च ते भानू सप्तमी २० एप्रिल २०२५ हा अभियानाचा २० दिवसांचा कालावधी असून मंदिरांनी यासाठी देखील सहकार्य करावे असे आवाहन पत्रकार परिषदेमध्ये राजीव जहागीरदार, नितीन डोळ, दिलीप खिस्ती, गणेश देशमुख, हेमंत गोंदीकर, अंजली देशपांडे ,संगीता वैद्य, आनंद लोहिया,अविनाश खिस्ती, अविनाश मुळे प्रशांत डोरले हे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.



# प्रसिद्ध नेत्रतज्ञ डॉ. पारखे यांचे निधन



शहरातील प्रसिद्ध डॉ. के. डी. पारखे (वय ७१ वर्ष) यांचे हृदयविकाराने प्रयागराज संगम येथे निधन झाले. आपल्या काही मित्रासमवेत ते दौऱ्यावर असताना ही दुर्घटना घडली. बीड शहरात आणि जिल्ह्यात नावाजलेले डॉ. के. डी. पारखे हे नेत्ररोग तज्ञ म्हणून सुपरिचित होते. आपल्या काही मित्रांसोबत ते प्रयागराज दौऱ्यावर होते. त्या ठिकाणी त्यांना अचानक हृदय विकाराचा त्रास झाला, उपचार सुरु करण्यापूर्वीच त्यांची प्राणज्योत मालवली. गेल्या काही वर्षापासून योग प्रशिक्षक म्हणून त्यांनी बीड जिल्ह्यात भरीव योगदान दिले. बीड शहरातील वैद्यकीय संघटनेचे अध्यक्षपद त्यांनी अनेक वर्ष भूषविले. डॉ. पारखे हे शांत, संयमी, मितभाषी आणि कार्यतत्पर म्हणून ते सर्वत्र सुपरीचित होते. प्रा. सुशीलाताई मोराळे यांचे ते पती होत. त्यांच्या पश्चात शिवराज व डॉ. अजित ही दोन मुले आहेत. पारखे कुटुंबियावर कोसळलेल्या दुःखात दैनिक किसान परिवार सहभागी आहे.

# मॅनेजरची गॅस एजन्सी कार्यालयातच आत्महत्या

इंडियन गॅस एजन्सीचा मॅनजरने बार्शी रोडवरील एजन्सीच्या कार्यालयातच गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना आज शनिवारी (दि.२२) सकाळी उघडकीस आली. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करुन मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल केला आहे. संतोष एकनाथ जाधव (वय ४० वर्ष) रा. बार्शी नाका असे मयत मॅनेजरचे आहे. ते इंडियन गॅस एजन्सी मध्ये मागील २० वर्षापासून मॅनेजर म्हणून जबाबदारी पार पाडत आहे. आज शनिवारी सकाळी एजन्सी मधील एका केबिनमध्ये संतोष जाधव यांचा गळफास घेतलेल्या अवस्थेत मृतदेह आढळला आहे. घटनेची पेठ बीड पोलीसांना माहिती दिली असता, तत्काळ पोलिसांनी घटना स्थळी येऊन पंचनामा केला व प्रेत शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आले. जाधव यांनी आत्महत्या केल्याचे सांगितले जात आहे. आत्महत्ये मागील कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. संतोष जाधव हे मनमिळावू स्वभावामुळे सर्वपरिचित होते.

# दंगलखोरांची प्रॉपर्टी विकून नुकसान भरपाई वसूल करु-देवेंद्र फडणवीस

नागपूर। प्रतिनिधी नागपूरमध्ये झालेल्या दंगलीत जे नुकसान झाले आहे त्याची भरपाई दंगेखोरांकडून वसूल केली जाणार आहे. १९९२ नंतर नागपूरमध्ये दंगलीसारखी कोणतीही मोठी घटना घडली नाही. त्यामुळे आता या दंगेखोरांना आता सरळ केलं नाही तर त्यांना सवय पडेल. त्यामुळे दंगेखोरांवर कारवाई करताना पोलिसांकडून कोणतीही दयामाया दाखवली जाणार नाही, असे वक्तव्य राज्याचे गृहमंत्री आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी नागपूरमध्ये वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची बैठक घेतली. या बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना त्यांनी म्हटले की, पोलिसांनी चार पाच तासांत दंगल नियंत्रणात आणली. त्यासाठी अश्रुधुराच्या नळकांड्यांचा वापर करण्यात आला. या सगळ्यात अनेक पोलीस कर्मचारी जखमी झाले. यानंतर पोलिसांनी दंगलीचे सीसीटीव्ही फुटेज, लोकांना मोबाईलवर केलेले चित्रीकरण याआधारे दंगेखोरांची ओळख पटवून त्यांच्यावर कारवाई केली आहे. आतापर्यंत १०४ दंगलखोरांची ओळख पटली आहे. त्यापैकी ९२ जणांना अटक केली आहे. तर १२ जण अल्पवयीन असल्याने त्यांच्यावरही विधिसंघर्षित कायद्यानुसार कारवाई सुरु आहे. आणखी काही लोकांना अटक करण्याचा पोलिसांचा मानस आहे. जो व्यक्ती दंगल करताना दिसतोय किंवा दंगलखोरांना मदत करताना दिसतोय, अशा प्रत्येकावर कारवाई करण्याच्या मानसिकतेत पोलीस आहेत. मोठ्याप्रमाणावर सोशल मिडिया ट्रॅकिंग करुन ज्या लोकांना दंगल भडकावण्यासाठी चिथावणी दिली, त्यांनाही सहआरोपी केले जाणार आहे. आतापर्यंत एकूण ६८ पोस्ट डिलिट करुन कारवाई करण्यात आली आहे. ज्या लोकांनी भडकावणारं पॉडकास्ट केलं, अफवा पसरवल्या, अशा सर्व लोकांवर कारवाई होईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. ज्या लोकांचं नुकसान झाले आहे, गाड्या फुटल्या आहेत, त्यांना येत्या तीन चार दिवसांत नुकसान भरपाई मिळेल. नागपूरमधील संचारबंदीमुळे जे काही निर्बंध आहेत,

# दादासाहेब खिंडकरच्या जीवाला धोका? वाल्मिक कराड कनेक्शन समोर

दादासाहेब खिंडकर याच्या जीवाला धोका असल्याचा दावा त्याची पत्नी आश्विनी खिंडकर यांनी केला आहे. कारागृहात वाल्मिक कराड आहे, त्यामुळे त्यांच्या जीवाला धोका होऊ शकतो. संतोष देशमुख हत्या प्रकरणात त्यांनी आवाज उठवला म्हणून त्यांच्या जीवाला धोका होऊ शकतो. धोका झाल्यास याची जबाबदारी कारागृह प्रशासनाची असेल, असं दादासाहेब खिंडकर याची पत्नी आश्विनी खिंडकर यांनी म्हटलं आहे. नेमकं काय म्हणाल्या आश्विनी खिंडकर? मी आज माझे पती दादासाहेब खिंडकर यांना भेटण्यासाठी जिह्ला कारागृहात गेले होते. तेव्हा त्यांनी मला माझ्या जिवाला धोका असल्याचे सांगितले आहे. कारागृहात वाल्मीक कराड आहे त्यामुळे त्यांच्या जिवाला धोका होऊ शकतो. संतोष देशमुख हत्या प्रकरणात आवाज उठविला म्हणून त्यांच्या जिवाला धोका होऊ शकतो. धोका झाल्यास याची जबाबदारी कारागृह प्रशासनाची असेल. माझ्या पतीला कारागृहात खूप त्रास सुरू आहे. त्यांना टॉर्चर केलं जात आहे.



मी कारागृह अधीक्षकांना भेटले नाही. केवळ पत्रव्यवहार केला आहे. माझ्या पतीची बराक बदलून द्यावी, अशी माझी मागणी आहे, असं आश्विनी खिंडकर यांनी म्हटलं आहे. दरम्यान बीड जिल्ह्याच्या मस्सोजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणात सीआयडीकडून आरोप पत्र दाखल करण्यात आलं आहे, त्यामध्ये वाल्मिक कराड हाच या हत्याकांडाचा मास्टरमाईंड असल्याचं म्हटलं आहे.

### मारहाणीचा व्हिडीओ व्हायरल

दादासाहेब खिंडकर यांचा एक व्हिडीओ व्हायरल झाला होता. त्यामध्ये तो एका व्यक्तीला अमानूष मारहाण करताना दिसून येत आहे. हा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर त्याला अटक करण्यात आली. सध्या तो जिह्ला कारागृहात आहे. मात्र आपल्या पतीच्या जीवाला धोका असल्याचा दावा त्याची पत्नी आश्विनी खिंडकर यांनी केला आहे. संतोष देशमुख हत्याप्रकरणात आवाज उठवल्यानं माझ्या पतीच्या जीवाला धोका आहे, वाल्मिक कराडपासून त्याच्या जीवाला धोका आहे. त्यामुळे माझ्या पतीची बराक बदलून द्यावी, अशी माझी मागणी खिंडकरच्या पत्नीने केली आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com